**महाराष्ट्र शासन**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड, नाशिक - 422101**
**दुरध्वनी क्र. 0253-2461909** **Email- Divcom.Nashik@maharashtra.gov.in**

प्रति,

1. मा. जिल्हाधिकारी, नाशिक.
2. मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र.
3. मा. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर.
4. मा. महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.
5. मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर.
6. मा. पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण.
7. मा. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक.
8. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक.
9. मुख्याधिकारी, त्र्यंबकेश्वर नगर परिषद, त्र्यंबकेश्वर.
10. उपआयुक्त (नियोजन), नाशिक विभाग, नाशिक.
11. विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक.
12. आरोग्य उपसंचालक, नाशिक.
13. अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग (गोदावरी नदी व जल व्यवस्थापनाचा प्रभारी), नाशिक.
14. मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.
15. मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक.
16. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, नाशिक.
17. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नाशिक.
18. सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक.
19. सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग.
20. रेल्वे मंडळाचे प्रतिनिधी.

विषय – दिनांक 17.06.2025 रोजी नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयान्वये दिनांक 17.06.2025 रोजी मा. अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली नव्याने स्थापन झालेल्या नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची प्रथम बैठक पार पडली. सदर बैठकीचे इतिवृत्त या सोबत पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येत आहे.

Signed by Karishma
Nandakumaran Nair
Date: 25-06-2025 14:07:54

(करिष्मा नायर)
कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव,
नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण

विषय:- नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त
दिनांक: १७ जून २०२५ रोजी झालेल्या

१७ जून २०२५ रोजी डॉ. प्रवीण गेडाम, अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक येथे नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची प्रथम बैठक पार पडली. बैठकीच्या सुरुवातीला श्रीमती करिष्मा नायर, कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण यांनी बैठकीस उपस्थित असलेल्या प्राधिकरणाच्या सर्व सदस्यांचे स्वागत करून त्यांनी बैठकीची रूपरेषा मांडली.

1. कुंभमेळा आराखड्याबाबत चर्चा:-

1. विविध विभागांकडून आणि तसेच सन्माननीय लोकप्रतिनिधी, साधु - महंत, संस्था, इत्यादींकडून कामांच्या मागण्यांची यादी सर्व सदस्यांना वाटण्यात आली. सर्व सदस्यांना विनंती करण्यात आली की त्यांनी यादीची तपासणी करून ७ दिवसांत त्यांच्या प्रतिक्रिया/ सूचना/ बदल कळवावेत. अध्यादेशानुसार कुंभमेळा आराखडा मंत्री समितीशी सल्लामसलत करुन शासनाला सादर करावयाचा असल्याने प्राधिकरण स्तरावर या सल्ला मसलतीपूर्वीची प्रक्रिया पूर्ण करुन ठेवणे आवश्यक आहे असे ठरले.

2. बैठकीत कुंभमेळ्यासाठी करावयाच्या कामांबद्दल आणि विविध विभागांनी सादर केलेल्या आराखड्याबद्दल सविस्तर चर्चा झाली. त्यात आतापर्यंत रस्ते, STP, नाशिक, सीसीटीव्हीसाठी आवश्यक असलेले ऑप्टिकल फायबर, रामकाल पथ, पूल (bridges) इत्यादी प्रसिद्ध केलेल्या निविदा लवकरात लवकर अंतिम करून व निधी उपलब्धतेची खात्री करून त्यांचे कार्यारंभ आदेश द्यावेत असे ठरले. तसेच नाशिक – त्र्यंबकेश्वर सीसीटीव्ही, नाशिक – त्र्यंबकेश्वर घाटांचे बांधकाम, नाशिक व त्र्यंबकेश्वर येथील जल शुद्धीकरण केंद्र, पाणी उपसा प्रकल्प, नाशिक महानगरपालिकेचे रस्ते इत्यादी प्रकल्प प्रगतीपथावर असलेल्या निविदा कार्यारंभ आदेश स्तरापर्यंत आणाव्यात असे ठरले.

3. सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक विभाग यांनी कुंभमेळ्याच्या आराखड्यातील कामांना कुंभमेळा निधी व्यतिरिक्त इतर योजनेतून (उदा.राज्यस्तरीय व इतर योजना इ,.) प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यास अशा प्रकरणात अध्यादेशानुसार प्रशासकीय मान्यता कशी द्यावी आणि निधीचे वितरण कसे करावे याबाबत अध्यादेशाचा अभ्यास करुन आणि आवश्यकतेनुसार शासनातील संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करुन अभिप्राय द्यावेत असे ठरले

2. नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या आकृतीबंधाबाबत चर्चा:-

1. बैठकीत प्राधिकरणासाठी आवश्यक असलेल्या स्टाफ बाबत देखील चर्चा झाली. यापूर्वी कुंभमेळा कक्षासाठी सादर केलेल्या प्रस्तावात थोडे बदल करून सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे मान्यता देण्यात येऊन शासनास प्रस्ताव सादर करण्याचे ठरले.

2. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व गुण नियंत्रणासाठी सल्लागार घेण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी असे ठरले.

3. मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय:-

1. प्राधिकरणाची बैठक दर दीड महिन्यांनी किंवा गरज भासल्यास अधिक वेळा घ्यावी, असे ठरवण्यात आले. अंतिम मंजुरीसाठी आवश्यक असलेले निर्णय अशा बैठकांमध्ये मांडले जातील. तथापि, प्राधिकरणाच्या बैठकांशिवाय विशिष्ट अजेंड्यासाठी गरजेनुसार, विषयानुसार अधिकाऱ्यांना बोलावून

प्रशासकीय आढावा बैठका घेतल्या जातील आणि या बैठकांचे इतिवृत्त प्राधिकरणाच्या सर्व सदस्यांना त्यांच्या माहितीसाठी पाठवले जाईल.

2. कुंभमेळा प्राधिकरणाच्या नवीन कार्यालयासाठी आवश्यक असलेल्या जागेबद्दल बैठकीत चर्चा करण्यात आली. त्याकरिता सदस्य सचिव यांनी जागा पाहणी करून निर्णय घ्यावा असे ठरले.

बैठकीच्या शेवटी श्रीमती करिष्मा नायर, कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण यांनी बैठकीस सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

Signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 24-06-2025 21:36:03
(डॉ. प्रवीण गेडाम)
अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण
तथा विभागीय आयुक्त, नाशिक

बैठकीस उपस्थित सदस्यांची यादी

| अ.क्र. | नांव, पदनाम व कार्यालय |
|---|---|
| 1 | श्री. जलज शर्मा, जिल्हाधिकारी नाशिक तथा उपाध्यक्ष कुंभमेळा प्राधिकरण |
| 2 | डॉ. पंकज आशिया, जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| 3 | श्री. मानिक गुरसळ, महानगर आयुक्त NMRDA तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| 4 | श्री. संदिप कर्णिक, पोलीस आयुक्त नाशिक शहर तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| 5 | श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| 6 | श्रीमती. मनिषा खत्री, महानगरपालिका आयुक्त तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| 7 | श्रीमती. अशिमा मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद, नाशिक तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| 8 | श्रीमती. करिष्मा नायर, कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण |
| 9 | श्री. प्रशांत औटी, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,नाशिक तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| 10 | श्री. राजेश गोवर्धने, अधीक्षक अभियंता जलसंपदा विभाग तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| 11 | श्री. माधव. धो. थैल, सहसंचालक लेखा व कोषागारे, नाशिक तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| 12 | डॉ. कपिल आहेर, उपसंचालक, आरोग्य सेवा तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| 13 | श्री. भरत वानखेडे, मुख्य अभियंता, मजप्र,नाशिक तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| 14 | श्री. योगेश गरड, रेल्वे बोर्ड प्रतिनिधी तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| 15 | श्री. व्ही.के.मिश्रा, रेल्वे बोर्ड प्रतिनिधी तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| 16 | श्री. एल. एस. भड, विभागीय अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नाशिक तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| 17 | श्री.आकाश बागुल, सहसंचालक नगररचना नाशिक विभाग तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |
| 18 | श्री. हेमंत अहिरे, उपआयुक्त (नियोजन) तथा पदसिध्द सदस्य कुंभमेळा प्राधिकरण |